**प्रेसनोट** दि. ०३/०७/२०२४

राजगुरुनगर-खेड तहसिल कार्यालय, ता. खेड, जि. पुणे येथील अव्वल कारकुनावर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | रमेश ज्योतीराम वाल्मिकी, वय ५१ वर्ष, पद – अव्वल कारकुन, नेमणुक - राजगुरुनगर-खेड तहसिल कार्यालय, ता. खेड, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- रुपये (विस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २५/०६/२०२४, २६/०६/२०२४, दि. २७/०६/२०२४, दि. ०३/०७/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. ०३/०७/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ०३/०७/२०२४ रोजी राजगुरुनगर- खेड तहसिल कार्यालयाचे आवारात, ता. खेड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी कुरुळे या गावी एक तुकडा बंदीची जमीन खरेदी केली होती. त्या जमीनीची नोंद सातबारा उता-यावर होण्याकरीता व त्याप्रमाणे नोंदणीचा आदेश मिळण्यासाठी तक्रारदार यांनी राजगुरुनगर-खेड तहसिल कार्यालयास रितसर अर्ज केला होता. तक्रारदार यांनी त्याकरीता असणारी शासकीय रक्कम चलनाने भरलेली होती. लोकसेवक रमेश वाल्मिकी यांनी सदरचा आदेश मंजूर करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक रमेश वाल्मिकी यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती २०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक रमेश वाल्मिकी यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.